RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १४९]　　गुरूवार, नोव्हेंबर २, २०२३/कार्तिक ११, शके १९४५　　[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ नोव्हेंबर, २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी विनियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि-१११८/प्र.क्र.२६६/पदुम-१४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शाश्वत मासेमारीकरिता कासवांची पिल्ले व पूर्ण वाढ झालेली कासवे पकडण्याचे टाळणे व त्यांची सुटका करणे यांसारख्या उत्तम व्यवस्थापन पद्धतींचा अंगीकार करून कासवांच्या साठ्याचे संवर्धन करण्याचे ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, कासव ही धोका उत्पन्न झालेली प्रजाती असल्याने, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) याच्या तरतुदींनुसार त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे ;

आणि ज्याअर्थी, अमेरिकेने अलिकडेच "कासव संवर्धन कार्यक्रमा" साठी विवक्षित शर्ती निर्धारित केलेल्या असून त्या, नैसर्गिक पर्यावरणातून कोळंबी पकडण्याशी संबंधित आहेत. कोळंबीची निर्यात करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या कोळंबी उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांनी, समुद्री कासवांना कोणताही धोका उद्‌भवणार नाही अशा प्रकारचे मासेमारीचे पर्यावरण ठेवण्याची आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, कासव अपवर्जक साधनांचा (टीइडी) वापर करण्यासह समुद्रातील कासवांना हानिकारक होणार नाही, अशा रीतीने कोळंबी पकडण्याच्या आणि समुद्री कासवांचे संवर्धन करण्याच्या तरतुदींचे पालन करण्याप्रती असलेल्या त्याच्या बांधीलकीच्या संदर्भात केंद्र सरकारने, आपल्या १६ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्राद्वारे, भारतातून केल्या जाणाऱ्या भावी निर्यातीचे संरक्षण करण्याकरिता राज्य शासनाला निदेश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, राज्य सल्लागार व संनियंत्रण समितीने अशी शिफारस केली आहे की, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधीमध्ये मासेमारी करताना, ट्रॉल जाळे वापरणाऱ्या प्रत्येक यांत्रिक मासेमारी गलबतांवर (नौकांवर) कासव अपवर्जक साधने (टीइडी) बसविण्यात येईल.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे विनियमन करीत आहे की, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधीमध्ये मासेमारी करताना, ट्रॉल जाळे वापरणाऱ्या प्रत्येक यांत्रिक मासेमारी गलबतावर (नौकेवर) कासव अपवर्जक साधन (टीइडी) बसविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कि. म. जकाते,**
शासनाचे उप सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 2nd November, 2023.

### Order

MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.

No.MATSYAVI-1118/C.R.266/ADF-14.—Whereas, the Government of Maharashtra has decided to conserve the turtle stock by adopting best management practices on a Sustainable fishing such as to avoid catching and to rescue the hatchlings and adults of turtle ;

And whereas, the turtle being endangered species needs to be protected and conserved as per the provisions of the Wild Life (Protection) Act, 1972 (Act No.53 of 1972) ;

And whereas, the USA has recently stipulated certain conditions for 'Turtle Conservation Program' which is relating to catching of shrimp from natural environment. The shrimp harvesting nations aiming to export shrimp are required to have fishing environment that do not cause any danger to sea turtles ;

And whereas, Central Government has its letter dated the 16th October, 2018 directed State Government to protect future export of shrimp form India, with reference to harvesting of shrimp in such a manner, not harmful to sea turtles including use of Turtles Excluding Devices (TEDs) and its compatibility towards compliance of the provisions of sea turtle conservation ;

And whereas, State Advisory and Monitoring Committee has recommended that every mechanized fishing vessels using Trawl net shall fit Turtles Excluding Device (TED) while fishing in the territorial waters of the State of Maharashtra.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 (Mah. LIV of 1981), the Government of Maharashtra hereby regulate that every mechanized fishing vessel using Trawl net shall fit Turtles Excluding Device (TED) while fishing in the territorial water of the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

K. M. JAKATE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.